# महाराष्ट्र शासन

## नागरिकांची सनद

### सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
### एन-१२ सेक्टर,सिडको
### औरंगाबाद-४३१००३

H:Est 1/ Nagrikachi Sanad /1532/SPI-1/2021

# प्रस्तावना

१. सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद या संस्थेची "नागरिकांची सनद" प्रसिध्द करतांना मला अतिशय आनंद तथा सार्थ अभिमान वाटत आहे. सध्याचे जग हे शैक्षणिक तसेच आर्थिक दृष्टीने अतिशय वेगाने वाटचाल करीत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर सुरू केलेल्या प्रशासकीय सुधारणांच्या कार्यक्रमात विविध शासकीय विभागाकडून नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक उपाययोजनांवर भर दिला जात आहे. राज्यातील नागरिक हा केंद्रबिंदू मानून शासनाकडून पुरविण्यात येणा-या विविध प्रकारच्या सेवा व योजनांची अंमलबजावणी करतांना पारदर्शकता, नियमाप्रमाणे काम, कालमर्यादा, कामाचा दर्जा, कार्यक्षमता राखणे व शासकीय सेवा पुरविण्यामध्ये स्तर निश्चित करून जबाबदारी निश्चित करणे इत्यादी बाबी "नागरिकांची सनद" या माध्यमातून साध्य करण्याची संकल्पना आहे. नागरिकांच्या सनदेचे लोकाभिमुखता, प्रतिसादशीलता, पारदर्शकता व गतिमानता हे महत्वाचे पैलू आहेत. त्याअनूषंगाने संपूर्ण संगणकीकरण करण्याकडे संस्थेची वाटचाल चालू आहे. पाल्यांना व त्यांच्या पालकांना संस्थेची माहिती, जाहिरात, संस्थेत दाखला घेण्यासाठी लागणारी शैक्षणिक व वैद्यकीय पात्रता इत्यादि बाबी घरबसल्या उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संस्था प्रयत्नशील आहे. शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्रीयन तरूणांना जास्तीत-जास्त संख्येने सेनादल, वायुदल व नौसेना यामध्ये अधिकारी म्हणून दाखल होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी मार्गदर्शन करणे ही एक मोठी उपलब्धी ठरू शकेल अशी आशा वाटते.

२. या छोटेखानी पुस्तिकेत पहिल्या भागात संस्थेची सर्वसाधारण उभारणी, सुरूवात व आतापर्यंतची यशस्वी वाटचाल या बद्दल माहिती देण्यात आलेली आहे. दुस-या भागात प्रत्यक्ष नागरिकांची सनद देण्यात आली आहे. संस्थेची भूमिका, कार्यविषयक माहिती, सशस्त्र दलात अधिकारी म्हणून जाण्यासाठीची पात्रता, संस्थेत त्यासाठी देण्यात येणारे प्रशिक्षण, संस्थेत दाखल होण्यासाठी घेण्यात येणारी लेखी/तोंडी परिक्षा व त्यासाठी लागणारे कागदपत्रे यांचा समावेश राहील. सेवा विहित कालावधीत पुरविण्यात आल्या नाहीत तर कोणाकडे तक्रार/संपर्क साधावा त्या अधिका-यांचे पदनाम व दुरध्वनी क्रमांक देण्यात आले आहेत. मात्र मला खात्री आहे की, यात नमूद केल्यानूसार विहित कालावधीत आवश्यक माहिती/सेवा नागरिकांना उपलब्ध होईल.

दिनांक २१ मे २०२१.

(अमित रा दळवी)
कर्नल (निवृत्त)
संचालक

## संस्थेचा पूर्व इतिहास

१. महाराष्ट्रातील मुलांची सैन्यदलांमध्ये अधिकारी पदावरील अत्यल्प संख्या लक्षात घेता, अधिकारी पदावरील महाराष्ट्रातील मुलांच्या संख्येत वाढ होण्यासाठी शासनाने काहीतरी ठोस उपाय योजना करावी. ह्या अनूषंगाने महाराष्ट्र शासनाचे गृह विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक एसबी (III)एम एम एम/०६७३/२ दिनांक १२ जूलै १९७३ अन्वये लेफ्ट.जनरल एस पी पी थोरात (निवृत्त) किर्तीचक्र, पद्मश्री, डीएसओ यांच्या अध्यक्षतेखाली व ले.कर्नल व्ही.बी.साठे (निवृत्त) सदस्य, कर्नल ल.वा.आरज (निवृत्त), सदस्य सचिव ही समिती स्थापन करून त्यांनी या मागील कारणे शोधण्यास व त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यास सांगण्यात आले.

२. सदर समितीच्या महाराष्ट्रातील विविध भागात पाच बैठका झाल्या. झालेल्या बैठकीचा आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्रातील युवकांनी संरक्षण दलात अधिकारी पदावर न जाण्याची खालीलप्रमाणे काही ठळक कारणे समितीच्या निदर्शनास आली.

अ. हुशार आणि शारीरिक दृष्ट्या सक्षम महाराष्ट्रातील तरूण सशस्त्र दलातील पगार कौटुंबिक जीवन पाहून याकडे आकृष्ट होतांना दिसत नाहीत.

ब. ज्या मुलांची इच्छा सशस्त्र दलात अधिकारी म्हणून जाण्याची असते, त्यांचे इंग्रजी, सामान्यज्ञान व चालू घडामोडी विषयीचे ज्ञान कमी पडते.

क. आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे नागरी सेवेतील अधिकारी वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त होतो व सैन्यदलातील अधिकारी वयाच्या ४८/५० व्या वर्षीच सेवानिवृत्त होतो व नागरी जीवनात त्याला स्थायिक होण्यास किंवा दुसरी नोकरी मिळण्यास ब-याच अडचणींचा सामना करावा लागतो.

ड. आणखी बरीचशी कारणे आहेत परंतू योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन यांच्या अभावामुळे महाराष्ट्रातील तरूण सशस्त्र दलात जाण्यास अपात्र ठरतो हे मुख्य कारण आहे.

३. उपरोक्त नमूद सर्व कारणांचा विचार करून सदर समितीने असा निष्कर्ष काढला की फक्त थोड्या कालावधी करिता छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर येथे चालविलेले प्रशिक्षण, संरक्षण दलात अधिकारी म्हणून जाण्यासाठी पुरेसे नाही. त्यासाठी प्रत्येक महसूल विभागात (पुणे ,नागपूर, कोल्हापूर व औरंगाबाद) येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था स्थापन कराव्यात. ह्या संस्था निवासी असाव्यात व राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मध्ये जाण्याकरिता असलेले आवश्यक शिक्षण तसेच शारीरिक प्रशिक्षण यांची उत्तम सोय येथे करण्यात यावी.

४. शासनाने सदर समितीचा अहवाल ग्राह्य धरून १९७७ साली प्रायोगिक तत्वावर औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केली.

५. **संस्थेची स्थापना व उद्दिष्ट**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील युवकांना संरक्षण दलात अधिकारी पदावर मोठ्या संख्येने जाता यावे या उद्देशाने जूलै १९७० मध्ये सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केली. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या तरूणांना सुध्दा संधी मिळावी म्हणून शासनाने संस्थेसाठी पूर्ण आर्थिक तरतूद केलेली आहे. ही संस्था संपूर्ण भारतात एकमेवाव्दितीय असून महाराष्ट्र शासनातर्फे चालवली जाणारी एकमेव संस्था आहे. आजमितीस पंजाब सरकारने अशाप्रकारची संस्था SPI चे प्रारूपावर आधारित संस्था सुरू केली आहे. उत्तरप्रदेश, तेलंगाणा, गोवा आदी राज्यें ही अश्या संस्था सुरू करण्याच्या तयारीत आहेत. संस्थेचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील तरूणांना योग्य वयात उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण पुरवून सैन्य अधिकारी बनण्याकरिता लागणारे गुण व कौशल्य त्यांच्या अंगात भिनवणे हा आहे. ज्यामूळे ते संरक्षण दलात अधिकारी पदावर मोठ्या प्रमाणात जाऊ शकतील आणि देशाच्या सैन्यदलास खंबीर आणि सक्षम नेतृत्व देवू शकतील.

६. सैन्य दलात अधिकारी बनण्याकरीता लागणारी बौद्धिक, शैक्षणिक व शारिरीक पात्रता विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्टरित्या निर्माण करणे हे संस्थेचे एकमेव उद्दिष्ट आहे. संस्थेत दिले जाणारे प्रशिक्षण असे आहे की, प्रत्येक छात्र हा एक उत्तम नागरिक बनतो. सैन्यदलात अथवा, यदाकदाचित सैन्यदलात रूजू न झाल्यास, निवडलेल्या क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करतो.

७. **संरचना**

संस्था ही महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-२८,मूंबई यांच्या अधिपत्याखाली आहे.

८. **संस्थेची रचना**

संस्थेची रचना परिशिष्ट “ब” मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. संस्थेचे ठळक वैशिष्ट असे आहे की, संस्थेचे कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी बहुतेक करून माजी सैनिक आहेत. त्यांची यादी परिशिष्ट “क” मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

९. सर्व प्राध्यापकांना तासिका तत्वावर पाचारण करण्यात येते.

१०. **संस्थेची उपलब्धी**

संस्थेची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत **१५९८** छात्रामधून **५४७** छात्र संरक्षण दलात (वायूदल,सेनादल व नौदल) अधिकारी पदावर कार्यरत आहेत.

११. **संरक्षण दलात पदकांचे मानकरी** संस्थेच्या खालील माजी छात्रांना जे अधिकारी म्हणून संरक्षण दलात कार्यरत आहेत त्यांना शौर्य पदके मिळालेली आहेत.

(अ) **किर्ती चक्र (मरणोप्रांत)**

(i) लेफ्टनंट कर्नल मनिष कदम

(ii) मेजर मनिष पितांबरे

(ब) **शोर्य चक्र**

(i) लेफ्टनंट कर्नल मुकुंद सरदार

(ii) कर्नल कमलेश शेंडे

(iii) कर्नल भास्कर वसाणे

(iv) कॅप्टन मिलिंद मोकाशी

(क) **युद्ध सेवा मेडल (USM)**

(i) कर्नल अमिताभ वालावलकर

(ड) **विशिष्ठ सेवा मेडल (VSM)**

(i) कर्नल सारंग उपासणी

(ii) लेफ्टनंट कर्नल प्रसाद बनसोड

(इ) **सेनामेडल (बार)**

(i) कर्नल हितेंद्र मराठे

(ii) कर्नल प्रणय पवार

(ई) **सेनामेडल (मरणोप्रांत)**

(i) कॅप्टन अविनाश सोमवंशी

(उ) **वायुमेडल (मरणोप्रांत)**

(i) स्कॉर्डन लिडर निनाद मांडवगणे

(ऊ) **सेनामेडल / वायुसेना मेडल / नौसेना मेडल**

(i) कर्नल अभिषेक बाजपेयी

(ii) ब्रिगेडियर निरंजन जोग

(iii) एयर कमोडोर हिरेंद्र आसुदानी

(iii) लेफ्टनंट कर्नल राजेश कुलकर्णी

(v) ब्रिगेडियर अनिल काकडे
(vi) कर्नल विक्रांत देसाई
(vii) कर्नल निनाद कुलकर्णी
(viii) ब्रिगेडियर नवाब अली खान
(ix) कर्नल केदार भिडे
(x) कर्नल चेतन दहीवड
(xi) कर्नल अभिजीत भांबरे
(xii) ग्रूप कॅप्टन सतीश परांडेकर
(xiii) कर्नल शुभांशु कामतुरकर
(xiv) ग्रुप कॅप्टन अभय फनसाळकर
(xv) लेफ्टनंट कर्नल अभिशेक जोग
(xvi) लेफ्टनंट कर्नल विनीत हेगडे
(xvii) लेफ्टनंट कर्नल मानस जोंधळे

१२. **फ्लॅग रँक अधिकारी**

(अ) ब्रिगेडियर सुमंत दशरथ (निवृत्त)
(ब) ब्रिगेडियर रत्नदिप पाटील (निवृत्त)
(क) ब्रिगेडियर विनय पांचपोर
(ड) ब्रिगेडियर निरंजन जोग,सेना मेडल
(इ) एयर कमोडोर प्रशांत वडोदकर
(ई) ब्रिगेडियर राजकुमार पैठणकर
(उ) कमोडोर प्रशांत शिधये
(ऊ) एअर कमोडोर हितेंद्र आसूदानी
(ए) ब्रिगेडियर व्ही.एस.देशपांडे
(औ) कमोडोर सुरेंद्र गोचके
(अं) ब्रिगेडियर हितेंद्र मराठे
(अः) ब्रिगेडियर अनिल महादेव काकडे, सेना मेडल
(क) ब्रिगेडियर विनोद रामचंद्रन अय्यर
(ख) ब्रिगेडियर शंतनु माईनकर
(ग) ब्रिगेडियर जयंत राजगुरू
(घ) ब्रिगेडियर नवाब अली खान

१३. **संस्थेतील प्रवेश प्रक्रिया**

खालील पात्रता धारण केलेले इयत्ता १०वी च्या वर्गात शिकत असलेले महाराष्ट्र राज्याचे रहिवासी विद्यार्थी ह्या संस्थेच्या लेखीपरीक्षेसाठी बसण्याकरिता पात्र आहेत.

अ. **वय** : विद्यार्थी त्यावर्षी १ जून रोजी १४.५ ते १६ या वयोगटातला असावा.

ब. **आरक्षण** : १००% आरक्षण महाराष्ट्राच्या युकांसाठी आहे. त्या व्यतिरिक्त सैन्य दलाप्रमाणेच संस्थेत कुठल्याही प्रवर्गाकरिता आरक्षण लागू नाही.

क. **शैक्षणिक पात्रता** : छात्र इयत्ता १०वी वर्गात शिकत असावा.

ड. **शारिरीक क्षमता** : छात्र शारिरीक तसेच मानसिक रित्या सुदृढ असावा. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) साठी UPSC तर्फे नियमीत केलेल्या शारिरीक स्तराचा असावा.

इ. **परीक्षा फॉर्म** : संस्थेच्या प्रवेश प्रक्रियेची जाहिरात दरवर्षी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वर्तमानपत्रात पसिध्द केली जाते. इच्छुक छात्र संस्थेच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरू शकतात. प्रवेश अर्जाचे शुल्क रू. ४५०/- आहे.

ई. **परीक्षेचे आयोजन** : पात्र छात्रांना लेखी परीक्षेकरिता पाचारण करण्यात येते. पात्र छात्रांची लेखी परीक्षा शैक्षणिक वर्षे - २०२१-२०२२ पासून माहे फेब्रुवारी मध्ये औरंगाबाद, पूणे, मुंबई, नाशिक, लातूर कोल्हापूर, अमरावती आणि नागपूर या ठिकाणी महाराष्ट्रात एकाच दिवशी घेण्यात येते. लेखी परीक्षा ही बहुपर्यायी प्रश्नांच्या स्वरूपातील एस.एस.सी व सी.बी.एस.ई च्या इयत्ता ८ वी ते १० वी च्या अभ्यासक्रमानुसार गणित, भूमिती, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व भौतिकशास्त्र तसेच इंग्रजी व्याकरण, इतिहास, भुगोल व सामान्यज्ञान ह्या विषयावर आधारीत, १५० गुणांची असते. परीक्षेत गणिताचे ७५ प्रश्न व गॅट (General Ability Test) चे ७५ प्रश्न असतात.

उ. **अंतिम निवड** : संस्थेच्या लेखी परीक्षेमधून गुणवत्ता यादीत निवड झालेल्या छात्रांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. अंतिम निवड केलेल्या छात्रांची गुणवत्ता यादी संकेत स्थळावर प्रसिध्द केली जाते. संस्थेत निवड झालेल्या छात्रांना माध्यमिक शालांत परिक्षेत (इ.१०वी) ६०% टक्के गुण प्राप्त झाले असतील तरच संस्थेत प्रवेश दिला जातो.

१४. **महाविद्यालयीन शिक्षण**

संस्थेत दाखल झालेल्या छात्रांना औरंगाबाद येथील महाविद्यालयात प्रवेश दिला जातो. प्रवेश दिल्यानंतर सदर महाविद्यालयात छात्र विज्ञान शाखेत ११वी व १२वी पर्यंत शिक्षण घेतात.

१५. **संघ लोकसेवा आयोग परीक्षा**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) आणि भारतीय नौदल प्रबोधिनी (INA) च्या परीक्षा वर्षातून दोन वेळेस साधारणत: सप्टेंबर आणि एप्रिल या महिन्यात होतात. छात्रांच्या ११वी व १२वी परीक्षेपूर्वी त्यांचे खास वर्गाचे आयोजन करून या परीक्षेची तयारी करून घेतली जाते. संघ

लोकसेवा आयोगाकडून (UPSC) घेतल्या जाणा-या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) आणि भारतीय नौदल प्रबोधिनी (INA) च्या प्रवेश परीक्षेची तयारी संबंधीतं विषयाच्या तज्ञ प्राध्यापकांचे

खास वर्ग सुमारे १५-१६ महिने आयोजित करून, तसेच सराव परीक्षा घेऊन सराव करून घेतला जातो.

१६. **संरक्षण सेवा निवड मंडळ (SSB)** छात्रांची व्यक्तिमत्व विकास ही पक्रिया छात्र संस्थेत रूजू झाल्यापासून सुरू झालेली असते. छात्रांचा व्यक्तिमत्व विकास नैसर्गिकरित्या होण्यासाठी

दैनंदिन कार्यक्रमात याचा समावेश जाणीवपूर्वक केला जातो. SSB च्या मुलाखतीला जाण्यापूर्वी १५ ते २० दिवस छात्रांचे खास शिकवणी वर्ग (Capsul Training) संचालक/संरक्षण दलातील माजी तज्ञ अधिकारी यांच्या व्दारे घेतले जातात. यामध्ये त्यांची शारिरीक क्षमता व मुलाखतीची तयारी करवून घेतली जाते.

१७. **संस्थेतील दैनंदिन कार्यक्रम**

**(अ) संस्थेचे शैक्षणिक सत्र** : संस्थेचे शैक्षणिक वर्षाचे पहिले सत्र हे जून ते ऑक्टोंबर व दूसरे सत्र नोव्हेंबर ते एप्रिल अश्या दोन शैक्षणिक सत्रांमध्ये दुभागले आहे. या दोन सत्रातील कालावधी मध्ये छात्रांना सुट्टी दिली जाते.

**(ब) शारिरीक प्रशिक्षण व खेळ** : संस्थेतील प्रत्येक छात्राला सकाळी शारिरीक प्रशिक्षण व कवायत असे ४० मिनिटांचे प्रशिक्षण दिले जाते. सांयकाळी ४५ मिनिटांचे खालील दिलेले खेळ खेळणे आवश्यक असते.

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | मुष्ठी युध्द | (iv) | हॉकी |
| (ii) | फुटबॉल | (v) | बास्केट बॉल |
| (iii) | व्हॉलीबॉल | (vi) | हँडबॉल |

**(क) आहार** : संस्थेतील गृहरक्षकांच्या देखरेखी खाली प्रत्येक छात्राला कमीत कमी ३००० कॅलरीज प्रत्येक दिवशी मिळतील असे भोजन दिले जाते. त्यासाठी भोजनाचे नियोजन तसेच वेळापत्रक छात्रांच्या गठीत केलेल्या समितीव्दारे तयार केले जाते. आहारतज्ञांच्या सल्ल्यानुसार चौरस आणि पौष्टिक आहार दिला जातो. भोजनामधे आठवड्यातून तीन किंवा चार वेळा मांसाहाराचा समावेश केला जातो. (मांसाहार करणे बंधनकारक नाही) आहाराचे साधारण स्वरूप असे असते :-

(i) नाष्ट्या मध्ये बोर्नव्हिटा दुध व बिस्कीट किंवा बनपाव आणि दोन अंडी/उपमा/पोहे/शिरा/दलिया/ब्रेड,बटर/चीज/जाम/मॅगी/साबुदाना खिचडी.
(ii) दुपारचे भोजन.
(iii) खेळा अगोदर चहा सोबत फल / फलाहार.
(iv) संध्याकाळी खेळानंतर दुध २५० मि.लि.
(v) रात्रीचे भोजन.

(ड) **धोबी शॉप व केशकर्तनाची सुविधा**: नमूद केलेल्या दोन्ही सुविधा छात्रांना संस्थेत उपलब्ध करून दिलेल्या आहेत. कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशिन उपलब्ध केलेली आहेत.

(इ) **वैद्यकिय औषधोपचार** : प्रत्येक छात्राचे वैद्यकीय परीक्षण संस्थेने निर्धारित केलेल्या वैद्यकीय अधिका-याव्दारे करण्यात येते. तसेच गरज भासल्यास तातडीने शासकीय दवाखान्यामध्ये किंवा खाजगी दवाखान्यात पाठविण्यात येते,जेणेकरून छात्रांना योग्य वेळेस योग्य उपचार करणे शक्य होते.यावेळेस छात्राला जो खर्च येतो तो त्यांना स्वत: भागवायचा असतो.(खालील परिच्छेद १८ (इ) पहावा)

१८. **शुल्क व शिष्यवृत्ती**

(अ) (i) छात्रांच्या पालकांकडून रू.३०००/-प्रति महिना.
(ii) शासनाकडून रू.२०००/-प्रति महिना शिष्यवृत्ती.

(ब) **संरक्षित ठेव** : खालील प्रमाणे प्रवेश घेताना जमा करावी लागते:-

(i) खुला प्रवर्ग - रू. ३०००/-
(ii) अनुसुचित जाती (SC) - रू. १५००/-

(क) **कॉशन मनी** : रू. १५००/- ना परतावा रक्कम घेण्यात येते.

(ड) **महाविद्यालयाचे शुल्क** : महाविद्यालयाचे शुल्क छात्रांना प्रत्येक वर्षी स्वत: भरावे लागते.

(इ) **विमा (एच्छिक)** : छात्र जेंव्हा संस्थेत दाखल होतात तेंव्हा छात्रांजवळ एक,जनता दुर्घटना या नावाने रू.१,००,०००/-चा विमा काढलेला असावा तसेच मेडीक्लेम या नावाने सुध्दा रू.२५,०००/-चा विमा काढलेला असावा.(ही पालकांची जबाबदारी आहे. संस्था ही सेवा पुरवीत नाही)

(ई) **इतर** : इतर खर्च वेळोवेळी लागणारा खर्च आवश्यकतेनुसार.

१९. **संस्थेची अनन्यसाधारणता व अव्दितीयता**

(अ) राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA),पुणे आणि भारतीय नौदल प्रबोधिनी (INA) येथे फक्त दोन वर्षाच्या तयारीनिशी पाठविणारी ही महाराष्ट्र शासनाची भारतातील पहिली संस्था आहे. ही अकरावीच्या विद्यार्थ्यांना मानसिक व शारीरिक दृष्टया परिपक्व करून त्यांना संरक्षण दलात जाण्यासाठी त्यांच्या मनाची तयारी करून घेते.

(ब) आर.आय.एम.सी. (RIMC) डेहराडून, सैनिकी शाळा आणि मिलीट्री शाळा ह्या केंद्रशासनाच्या पुर्णत: अथवा अंशत: अनुदानावर चालणाऱ्या संस्थाच्या तुलनेने, ही संस्था १००% राज्य शासना तर्फे चालवली जाते. वर नमुद केलेल्या एक RIMC, ३४ सैनिक

स्कुल आणि पाच मिलिट्री स्कुल पेक्षा संस्थेचा रिझल्ट RIMC वगळता, सर्व सैनिक स्कुल / मिलिटरी स्कुल पेक्षा अव्वल आहे.

(क) छात्रांवरती वैयक्तिकरित्या लक्ष देण्यास संस्थेमध्ये छात्र व संस्थेचे कर्मचारी यांचे प्रमाण १:६ असल्यामुळे छात्रांकडे योग्य लक्ष पुरविणे शक्य होते.

(ड) संस्थेचे कर्मचारी माजी सैनिक असल्यामुळे संस्थेतील कार्याला एक वेगळे पोषक वातावरण होण्यास मदत मिळते.

(इ) छात्रांची योग्य वयात निवड करून संस्थेत दाखल झाल्यानंतर त्यांची संरक्षण दलात जाण्याची संपूर्ण मानसिक तयारी करून घेतली जाते.

(ई) महाराष्ट्र शासनाचे संपूर्ण अनुदान असल्यामुळे छात्रांच्या पालकांकडून इतर याप्रकारच्या खाजगी संस्थेंच्या तुलनेत अतिशय कमी प्रमाणात शुल्क आकारणी केली जाते.

**समारोप**

१९. छात्रांच्या सर्वांगीण मानसिक व शारीरिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. छात्रांच्या महाविद्यालयीन शिक्षणासोबतच त्यांच्या मध्ये सैन्य अधिकाऱ्याला आवश्यक असलेले नेतृत्व गुण संस्थेतील त्यांच्या वास्तव्यात अंगी रूजू घातले जातात. या सर्वांमुळे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) आणि भारतीय नौदल प्रबोधिनी (INA) मध्ये जास्त संख्येने छात्र पाठविणारी संस्था असून, जास्तीत-जास्त संख्येने महाराष्ट्रातील युवकांना संरक्षण दलात अधिकारी पदावर नियुक्त करण्यास ही संस्था कटीबध्द आहे.


## भाग-२ नागरीकांची सनद

### सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद या संस्थेकडून पुरविल्या जाणा-या सेवा,त्यासाठी आवश्यक कागदपत्रे,कालावधी व सेवा पुरविणारा अधिकारी इ.

| अ.क्र. | संस्थेकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | विहीत कालावधीत सेवा पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | ह्या कार्यालयाकडून संस्थेत प्रवेश घेवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना,नागरिकांना संस्थेमध्ये प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक पात्रते संबधीत माहिती पुरविली जाते.तसेच प्रवेश प्रक्रिये संबधी दरवर्षी राज्यातील शिक्षण अधिकारी,व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी व वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालयनालय,मुंबई मार्फत पाठविण्यात येते. | संस्थेच्या लेखी परीक्षेचा अर्ज करण्यासाठी छात्र हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.त्यासाठी डोमिसाईल प्रमाणपत्र आवश्यक आहे. परीक्षा अर्जाची किंमत रू.४५०/- इतकी आहे. | नागरिकांनी/विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष संस्थेत भेट दिल्यास संस्थेची तथा संस्थेच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती तात्काळ पुरविली जाते.तसेच शैक्षणिक संस्था असल्यामूळे संस्थेच्या लेखी परीक्षेसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे संस्थेच्या जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या तारखेप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांना पुरविली जाते. | सदरहू जबाबदारी ही छात्रांसंदर्भात सेवा गृहरक्षक आणि इतर सेवा अधीक्षक-नि-लेखापाल वर्ग-२ तसेच त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांची आहे. | संचालक,सैनिकी सेवापूर्व शिक्षण संसथा,एन-१२ सेक्टर,सिडको, औरंगाबाद दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३८१३७० |

प्रपत्र "ब"

# सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था (ORGANISATION CHART)




Total Strenght Class Wise

| I | II | III | IV | Total |
|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 06 | 08 | 17 |

H:Est 1/ Nagrikachi Sanad /1532/SPI-1/2021

प्रपत्र "क"

# सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद कर्मचा-यांची यादी

| अ.क्र. | सैन्यातील पद | कर्मचा-याचे नांव | संस्थेतील पद | सैन्य सर्व्हीस | जन्म दिनांक | नियुक्तीचा दिनांक | निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Colonel | अमित रा दळवी | संचालक वर्ग-१ | Arty | ०८/०१/१९७३ | २४/०५/२०१९ | ३१/०१/२०३१ |
| २. | JWO | राजू शं.मानेकर | गृहरक्षक वर्ग-२ | Air Force | १२/०१/१९६४ | १५/१२/२०१२ | ३१/१२/२०२२ |
| ३. | Hav/Clk | संजय स महाजन | लेखालिपिक व प्रभारी अधिक्षक-नि-लेखापाल | AOC | ०९/११/१९६८ | १८/०३/२००८ | ३०/११/२०२६ |
| ४. | Hav | विजय एम गोरे | वरिष्ठलिपिक | Maratha LI | ३०/०३/१९७७ | २२/०८/२०१३ | ३०/०३/२०३५ |
| ५. | Hav/Clk | विष्णू बी गोराडे | क्लर्क कम टायपिस्ट | Arty | ०७/०८/१९७० | २२/०८/२०१३ | ३१/०८/२०२८ |
| ६. | Hav/Clk | प्रकाश सु.कुलकर्णी | लघुलेखक उच्चश्रेणी | GR | २५/०६/१९७० | १७/०४/२००६ | ३०/०६/२०२८ |
| ७. | Nk/MT | प्रकाश पी देशपांडे | वाहनचालक | ASC | १८/०८/१९६७ | २०/१२/२०११ | ३०/०८/२०२५ |
| ८. | NK-GD | सुधाकर सी.सुरळकर, **सेनामेडल** | शिपाई | Maratha LI | १३/०५/१९६१ | २८/०९/२००५ | ३१/०५/२०२१ |
| ९. | Hav/GD | रामदास जी.मालकर | शिपाई | Maratha LI | ०१/०१/१९७० | २०/१२/२०११ | ३१/१२/२०३० |
| १०. | Nk/GD | श्रीहरी ना.चव्हाण | पहारेकरी | Maratha LI | ०१/०९/१९७१ | २२/०८/२०१३ | ३१/०८/२०३१ |
| ११. | Sep/Cook | शिवाजी मु.गुंड | स्वयंपाकी | Punjab Regt | २५/०२/१९७० | १९/१२/२००० | २८/०२/२०३० |
| १२. | Civilian | राजेंद्र रा लोहोट | सफाईगार | - | १०/०४/१९६८ | २६/०६/१९९० | ३०/०४/२०२८ |
| १३. | NK/Safai | प्रताप आर सुरडकर | सफाईगार | AMC | ०५/०६/१९६४ | २९०/०९/२०१४ | ३०/०६/२०२४ |
| १४. | Nk/Dvr MT | कैलास कौ काकडे | सफाईगार-नि पहारेकरी | AMC | २०/०६/१९६६ | १४/११/२००९ | ३०/०६/२०२६ |
| १५. | Civilian | गणेश आर घुगे | माळी | - | ०९/०६/१९६४ | २४/१२/१९९० | ३०/०६/२०२४ |

**दोन पदे रिक्त आहेत-**

वर्ग-२

- अधिक्षक-नि-लेखापाल -०१

वर्ग-३

- शा.प्र.नि.-१